# सूचना

**विषय- परदेशात एमबीबीएस झालेल्या विद्यार्थ्याना आंतरवारीयता प्रशिक्षणासाठी परवानगी .**

वाचा --१) शासन निर्णय क्रमांक. एमईडी-१६०१/प्र.क्र.३८२/०१/शिक्षण-२ दि.०८/०१/२००३
२) शासन पुरकपत्र क्र. एमईडी-१६०१/प्र.क्र.३८२/०१/शिक्षण-२ दि.१५/०२/२००३
३) महाराष्ट्र वैद्यकीय परिषद प्रबंधक यांचे पत्र क्र.मवैप/आंतरवारीयता/२०१९/०३३१६ दि.०६/०८/२०१९
४) संचालक,वैद्यकीय शिक्षण व संशोधन ,मुंबई यांचे पत्र क्र. संवैशिवसं/परदेश/एमबीबीएस / आंतरवारीयता /२-अ, दि.०१/०१/२०२० व दिनांक १४/१/२०२०

संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी कळविल्यानुसार इंडियन कौन्सिल ॲक्ट, १९५६ कलम १३ (३) नुसार परदेशात एमबीबीएस पदवी पुर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना १२ महिने कालावधीची आंतरवारीयता पुर्ण करणे आवश्यक आहे. सदर विदयार्थ्यांना आंतरवासियता पूर्ण केल्याशिवाय त्यांना महाराष्ट्र मेडीकल कॉन्सील मुंबई यांचे नोंदणी प्रमाणपत्र मिळत नाही.

संचालक, वैदयकिय शिक्षण व संशोधन यांचे संदर्भिय पत्र दिनांक १/१/२०२० अन्वये सदर विदयार्थ्यांनी एमसीआय च्या प्राधिकृत महाविद्यालयामध्ये १० महिने आंतरवासिता प्रशिक्षण पूर्ण करुन त्यांनंतर ग्रामीण भागात (पीएचसी) २ महिने आंतरवासीयता प्रशिक्षण पूर्ण करणे अनिवार्य असल्याचे कळविले आहे व दिनांक १४/१/२०२० च्या पत्रान्वये सदर विदयार्थ्यांनी एमसीआय च्या प्राधिकृत महाविद्यालयामध्ये १२ महिने आंतरवासिता प्रशिक्षण पूर्ण करण्यांस हरकत नसल्याचे कळविले आहे.

परदेशात एमबीबीएस पदवी पुर्ण करुन सदर विद्यार्थी एमसीआयच्या प्राधिकृत महाविद्यालयामध्ये परस्पर १० महिन्याचे आंतरवासीयता प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर उर्वरित २ महिने ग्रामीण भागात आंतरवासीयता पुर्ण करणेसाठी किंवा संपूर्ण १२ महिने एकाच संस्थेत पूर्ण करण्यासाठी सदर विदयार्थ्यांना मुंबई येथील आयुक्तालय कार्यालयात येवून अर्ज दयावे लागतात. सदर विदयार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होऊ नये या हेतूने सदर विदयार्थ्यानां आयुक्तालयस्तरावरुन विभागीय कार्यालयाकडे वर्ग करताना प्राथमिक आरोग्य केंद्रातील त्यांचे आंतरवासिता प्रशिक्षण कार्यरत तज्ञ वैद्यकीय अधिका-यांच्या देखरेखी खाली होईल याची दक्षता घेण्याबाबत सुचना देण्यात येत होत्या.

मा. आयुक्तांच्या मान्यतेने असा निर्णय घेण्यांत येत आहे की, सदर विदयार्थ्यांच्या सोयीसाठी व आंतरवासियता प्रशिक्षणासाठी विभागीय मंडळाकडूनच कार्यवाही होत असल्याने सदर विदयार्थ्यांनी संबंधित विभागीय स्तरावरच अर्ज सादर करावेत., सदर विद्यार्थ्यांना एमसीआय च्या प्राधिकृत महाविद्यालयामध्ये/संस्थानमध्ये आंतवासियता प्रशिक्षण पूर्ण करण्यास परवानगी देण्याबाबत उपसंचालक आरोग्य सेवा यांना प्राधिकृत करण्यांत येत आहे. तसेच परदेशातील महाविद्यालये ही खाजगी असल्याने सदर आंतरवासीयता विद्यार्थ्यांकडून वसूल करण्यात येणा-या शुल्काबाबत वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, यांचे वाचा क्र.१ व २ अनुसार शुल्क आकारणी करावी, व महाराष्ट्र वैद्यकीय परिषद प्रबंधक यांचे वाचा क्र. ३ नुसार सदर विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय परिक्षा बोर्डाची परीक्षा व महाराष्ट्र मेडीकल कौन्सील, मुंबई यांचेकडील प्रोव्हीजनल नोंदणी प्रमाणपत्र असलेल्या उमेदवाराची शैक्षणिक कागदपत्र तपासून व खात्री करुनच व प्राथमिक आरोग्य केंद्रातील कार्यरत तज्ञ वैद्यकीय अधिका-यांच्या देखरेखी खाली होईल याची दक्षता घेऊनच आंतरवासीयता प्रशिक्षणाकरीता विभागीय स्तरावरुन योग्य त्या प्राथमिक आरोग्य केंद्रात वर्ग करावे.

Scanned with CamScanner